प्रेक्षकांच्या ह्रदयात शिरायचं आहे. त्यांच्या मन व बुध्दीला आपल्या जिवंत भूमिकेने स्पर्श करायचा आहे. या अभ्यासू पध्दतीने ते गेले तर गावोगावी त्यांची नाटके प्रेक्षकांना आवडू लागतील व त्यामुळे त्या त्या गावी प्रेक्षकांची अभिरुची व नाटकाबद्दलचे प्रेम वाढू लागेल आणि मग आपल्या जवळ असलेल्या कलावंताच्या चमूसाठी अभ्यासू व चांगल्या लेखकांकडून, चांगल्या संहिता लिहून घेऊन, उत्कृष्ट नाटके या हौशी मंडळ्या सादर करु शकतील आणि मग यातूनच हळूहळू मुंबई पुण्याप्रमाणे तुम्ही आपल्या गावी व प्रदेशात व्यावसायिक रंगभूमी निर्माण करु शकाल, यात शंका नाही.

शेवटी समाजरत्नांची खाण, महाराष्ट्राची शान, सामाजिक परिवर्तनाचे भान आणि निसर्गाचे अमूल्य वरदान असलेल्या हिरव्याकंच अशा कोकणात, त्यातही रत्नागिरी येथे ९१ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संम्मेलनासाठी आलेल्या सर्व नाट्यप्रेमी, नाट्यधर्मी, रंगकर्मींचं, सागराच्या साक्षीने मनापासून स्वागत करतो. या संमेलनात तीन दिवस चालणा-या प्रत्येक नाट्यविषयक उपक्रमांचा आस्वाद घेऊन मराठी रंगभूमीला समृध्द करा, अशी विनंती करतो. या नाट्यसंमेलनात क्षणोक्षणी मिळणा-या नाट्यानंदाने तृप्त होऊन आपण संमेलनाचा निरोप घ्याल आणि परततांना संमेलन आयोजकांना व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेला व शाखेला या तीन दिवसांत संमेलनासाठी मन:पूर्वक सहकार्य कराल, असा विश्वास व आशा बाळगून विनम्रतेने आपला निरोप घेतो.

धन्यवाद!

राम जाधव,

अध्यक्ष

९१ वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन, रत्नागिरी.